दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र | शुक्रवार दि.७ मार्च २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-१३१ | पाने ४ | किंमत ४ रुपये

### भैय्याजी जोशींना आपण मराठी आहोत याचे भान नाही का?

**मुंबई**–मराठी भाषेवर बोलताना भैय्याजी जोशी यांनी आपण मराठी आहोत याचे भान सोडावे? असा प्रश्न महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी उपस्थित केला. जोशीबुवांनी अशा काड्या करू नये, अशा शब्दात त्यांनी या वक्तव्याचा समाचार घेतला. इतकेच नाही तर या वक्तव्याचा भाजप निषेध करणार आहे का? असा प्रश्न विचारत त्यांनी भाजपला देखील आव्हान दिले आहे.या संदर्भात राज ठाकरे यांनी एका पोस्टच्या माध्यमातून भाजप आणि भैय्याजी जोशी यांच्यावर टीका केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना या विधानाचा निषेध नोंदवत असल्याचे देखील ते म्हणाले. इतकेच नाही तर मराठी माणूस हे वाक्य कधीही विसरणार नाही, हे जोशीबुवांनी लक्षात ठेवावे, असे देखील राज ठाकरे यांनी म्हटले आहे. यावर सविस्तर ३० तारखेला गुढीपाडव्याच्या मेळाव्यात बोलणार असल्याचा इशारा देखील राज ठाकरे यांनी दिला आहे.

# लाडक्या बहिणींना लगेच २१०० रुपये नाही–तटकरे

## निवडणूक आश्वासनावरून महायुतीचे घूमजाव



**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने सत्ता आल्यास लाडक्या बहिणींना १५०० रुपयांवरून २१०० रुपये अर्थसाह्य देण्याचे आश्वासन दिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही येत्या अर्थसंकल्पात यावर निर्णय घेण्याचे म्हटले होते. पण आता अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी घूमजाव केले आहे. 'येत्या अर्थसंकल्पात महिलांना २१०० रुपये देऊ अशी घोषणा सरकारने केलीच नव्हती,' अशी माहिती त्यांनी बुधवारी विधान परिषदेत दिली. त्यामुळे विरोधकांनी सरकारचा समाचार घेतला आहे.

उद्धवसेनेचे अनिल परब यांनी याबाबतचा प्रश्न विचारला होता. 'महिलांना वाढीव पैसे दिले जात नाहीत. उलट निकषाचे कारण देऊन लाभार्थींची संख्या कमी केली जात आहे. काही महिला संजय गांधी निराधार आणि लाडकी बहीण या दोन्ही योजनांत आहेत. याचा अर्थ या महिलांकडून सरकारची फसवणूक होत आहे. काही अधिकाऱ्यांमुळे महिलांना दोन्ही योजनांचा लाभ होत आहे.यामुळे सरकारी पैशांचा अपव्यय केला जात आहे. अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का ?' असे परब म्हणाले. निवडणुकीपूर्वी लाडकी असलेली बहीण निवडणुकीनंतर सावत्र झाली का, असा सवाल काँग्रेसचे सतेज पाटील यांनी केला. सरकारची तिजोरी ज्यांनी रिकामी केली, त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा, अशी मागणी शशिकांत शिंदे यांनी केली. तसेच लाडक्या बहिणींकडून आता वसुली सुरू आहे. ही तरतूद मंत्र्यांच्या खात्यातून वसूल करणार का, अशा प्रश्नांचा भडिमार केला. या वेळी सदस्य भाई जगताप, चित्रा वाघ यांनी लक्षवेधीवर मते मांडली.

मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या की, ऑगस्टपासून या योजनेसाठी पडताळणी सुरू झाली. संजय गांधी निराधार योजनेतील डेटा प्राप्त झाला. इतर विभागांकडून आम्हाला डेटा येतो. त्यामुळे त्या-त्या पद्धतीने कारवाई आम्ही करत आहोत. येत्या अर्थसंकल्पात २१०० रुपये देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली नव्हती. निवडणुकीतील जाहीरनामा हा पाच वर्षांचा असतो. त्यामुळे २१०० रुपयांसाठी योग्य तो प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आम्ही ठेवू. त्यानंतर निर्णय घेतला जाईल. महिलांना दिलेले पैसे परत घेतले जाणार नाहीत.'


## सरपंच/ सदस्य यांना अपात्र केलेला जिल्हाधिकारी यांचा आदेश रद्द करावा

### प्रा.ईश्वर मुंडे यांची आ.जयंत पाटील यांच्याकडे मागणी

**मुंबई | प्रतिनिधी**

मागील दोन वर्षांपूर्वी जनतेतून निवडून आलेले राखीव प्रवर्गातील सरपंच व सदस्य यांनी आपले जात वैद्यता प्रमाणपत्र वेळेत सादर केले नाहीत या कारणास्तव श्री अविनाश पाठक,जिल्हाधिकारी बीड यांनी दि.२०/१२/२०२४ रोजी जिल्ह्यातील सरपंच व सदस्य यांना अपात्र केले.

या मध्ये अनेकांनी आपले जात वैद्यता प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर केलेले आहे.कांहीचे प्रमाणपत्र मिळाले पण उशीर झाला म्हणून दाखल करून घेतले



नाही.अशा कांही चुका जिल्हाधिकारी,बीड कार्यालयाने केल्या आहेत.नैसर्गिक न्यायाच्या नियमाने संबंधितांना एखादी अंतीम नोटीस देणे अपेक्षीत असते.असे न करता अपात्र ठरवण्याचे आदेश काढणे बेकायदेशीर आहे.अशी कारवाई फक्त बीड जिल्ह्यातच केलेली आहे.

तरी विधान सभा अधिवेशनात तारांकीत प्रश्न उपस्थीत करून जिल्हाधिकारी बीड यांचे आदेश रद्द करण्यास शासनास भाग पाडावे अशी विनंती प्रा.ईश्वर मुंडे,महाराष्ट्र राज्य प्रमुख,सेवा निवृत्त अधिकारी सेल,राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांनी मुंबई येथे आ.जयंत पाटील,प्रदेशाध्यक्ष,राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष,महाराष्ट्र राज्य यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

## सद्भावना पदयात्रेत सहभागी व्हा–परवेज कुरेशी

**बीड | प्रतिनिधी**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात, बीड जिल्ह्यातील विविध जाती आणि धर्मातील बंधु भगिनींनी सहभाग घेण्यासाठी ८ आणि ९ मार्च रोजी सद्भावना पदयात्रा आयोजित करण्यात येत आहे. काँग्रेसचे बीड शहर अध्यक्ष परवेज कुरेशी यांनी या पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.८ मार्च रोजी सकाळी स्व. संतोष देशमुख यांना अभिवादन करून या पदयात्रेची सुरुवात होईल. यानंतर नांदुरफाटा आणि येळंबफाटा मार्गे नेकनुर येथे मुक्कामी होण्यात येईल. दुसऱ्या दिवशी, म्हणजे ९ मार्च रोजी सकाळी ८ वाजता बंकटस्वामी संस्थान येथून ही पदयात्रा सुरू होईल. यामध्ये मांजरसुंभा, पाली मार्गे बार्शीनाका, आणि



मोमिनपुरा मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करून सुभाष रोड, बस स्टँड मार्गे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात येईल. या पदयात्रेचा समारोप यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे होणार आहे.

या सद्भावना पदयात्रेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, अ. भा. काँग्रेसच्या सचिव खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्यासह बीड जिल्ह्यातील व शहरातील अनेक मान्यवर सहभागी होणार आहेत.काँग्रेसच्या बीड शहर अध्यक्ष परवेज कुरेशी यांनी सर्व जाती व धर्मातील लोकांना योगदान देण्याचे आवाहन केले आहे, कारण काल्हीत जातीयद्वेष कमी करण्याचा हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. सर्वांना एकत्र येण्यास आणि सद्भावना वाढविण्यासाठी या पदयात्रेत सहभागी होण्यास प्रोत्साहित करण्यात आले आहे.

# सद्भावना पदयात्रेमध्ये सहभागी होणार–नितीनजी जायभाये

### बीड शहर बचाव मंच सदैव सद्भावने सोबतच!

**बीड | प्रतिनिधी**

राष्ट्रीय इंदिरा काँग्रेस पक्षाच्या व काही सामाजिक संघटना, इतर काही पक्ष या सर्वांच्या वतीने पुढाकार घेऊन मसाजोग, केज येथून बीड पर्यंत काढण्यात येणाऱ्या सद्भावना' पदयात्रेमध्ये काँग्रेस व इतर मित्र पक्षांचे पदाधिकारी, इंदिरा काँग्रेस पार्टीचे बीड शहराध्यक्ष मा. परवेजभाई कुरैशी, इंटक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रामधनभाऊ जमाले तसेच त्यांचे सर्व सहकारी,आमच्या सर्व स्नेही बांधवांच्या आमंत्रणानंतर बीड शहर बचाव मंचाच्यावतीने अध्यक्ष/ निमंत्रक श्री. नितीनजी जायभाये हे सद्भावना पदयात्रेमध्ये सहभागी होणार आहेत, असे प्रस्तुत पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

काही राजकीय नेते पुढारी स्वतःच्या राजकीय महत्त्वकांक्षा पूर्ण करण्यासाठी जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करून, विषमतेचे विष समाजामध्ये पसरवून स्वतःच्या राजकीय पोळ्या भाजण्याचे डाव साधत आहेत. विषमतेचे विष पेरून गढूळ केल्या जात असलेल्या या सामाजिक परिस्थितीमध्ये सर्वसामान्य, निर्दोष माणूस भरडला जात आहे. जाती जातीमध्ये द्वेष निर्माण करण्यासाठी रोज नवीन-नवीन कटकारस्थाने व योजना आखल्या जात आहेत. सामाजिक भेदभाव, जाती जातीमध्ये वाढत चाललेली द्वेष भावना आणि त्यातूनच निर्माण होणारे दुष्परिणाम, अराजकता, कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न, गुन्हेगारी प्रवृत्तीला मिळणारे बळ या सर्व सामाजिक संतुलन नष्ट करणाऱ्या प्रवृत्तींपासून समाजाला व



पुढच्या पिढीला वाचविणे गरजेचे आहे. सामाजिक विवेक व लोकांची सदसद्विवेक बुद्धी जागृत ठेवणे गरजेचे आहे. अशाच उदात्त भावनेतून समाजामध्ये न्याय भावना, न्यायव्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी सद्भावना जागृत राहणे गरजेचे आहे. सामाजिक सलोखा, ऐक्य वाढविण्यासाठी सद्भावना यात्रेचे आयोजन उपयुक्त ठरू शकते. तरी आयोजकांनी 'सदभावना यात्रे'सारखा स्तुत्य उपक्रम हाती घेऊन दिलेल्या आमंत्रणाचे आभार मानून, सद्भावना यात्रेसारखा स्तुत्य उपक्रम हाती घेतल्याबद्दलही सर्व आयोजकांचे आभार मानतो. आम्ही सर्व बीड शहर बचाव मंचाचे सर्वच पदाधिकारी तथा सर्व सदस्य आणि सद्भावनेचे खरे अनुयायी म्हणून मोठ्या संख्येने सद्भावना यात्रेमध्ये सहभागी होणार आहोत. तरी बीड शहरातील समस्त समाज बांधवांनी मोठ्या बहुसंख्येने सद्भावना यात्रेमध्ये सहभागी व्हावे असे विनम्र आवाहन बीड शहर बचाव मंचच्या वतीने करण्यात येत आहे.

## ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी अँग्रीस्टँक साठी नोंदणी करावी–प्रभारी तहसीलदार सुरेश पाळवदे




**किल्ले धारूर | प्रतिनिधी**

धारूर तालुक्यात अँग्री स्टँक मोहीम राबवण्यात येत असून भोपा, देवदहीफळ मोहखेड आदी ठिकाणी जाऊन योजनेची सविस्तर माहीती देऊन या योजनेत नोंदनी करून लाभ घ्यावा असे आवाहन धारूर तहसील कार्यालयाचे प्रभारी तहसीलदार सुरेश पाळवदे यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

शेतकऱ्यांची सर्व गैरसोय दुर व्हावी व सर्व सुविधा त्यांना एका क्षणात मिळाव्यात, त्यांच्या वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी शासन ग्रीस्टॅक योजना राबवत असून फार्मर आयडी व फार्म आयडी काढणे या साठी बंधन कारक केले असून याची सी एस सी सेंटर वर यांची नोंद केली जात आहे .याचे कॅम्प मध्ये काम चालू आहे .देवदहीफळ, भोपा मोहखेड आदी ठिकाणी प्रभारी तहसीलदार सुरेश पाळंदे यांनी भेटी देऊन पहाणी केली व शेतकऱ्यांना माहीती सांगीतली . सी एस सी केंद्र मोहखेड येथे प्र.तहसीलदार सुरेश पाळवदे यांनी शेतकऱ्यांना एकत्रित करून या योजनेचे शेतकऱ्यांना होणारे फायदे सांगून तात्काळ नोंदणी करण्याचे अवाहण केले. यावेळी मंडळ अधिकारी सोपान वाघमारे, तलाठी भद्रे व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कैलास बोराडे मारहाण प्रकरणी सर्व आरोपीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात यावी–किरण चव्हाण

**बीड | प्रतिनिधी**

२६ फेब्रुवारी रोजी जालना जिल्ह्यातील अनवा या गावी राहत असलेले कैलास बोराडे यांना गावातील काही गुंडांनी अमानुषपणे मारहाण करून त्यांना लोखंडी सळ्या गरम करून अंगावर चटके देण्यात आले व संबंधित प्रकरणाचा व्हिडिओ काढून सोशल मीडियावर पसरवून समाजामध्ये दहशत माजवण्याचा प्रयत्न करण्यात आला शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांप्रकरणी दखल घेतली असून पीडित तरुणाला घाटी रुग्णालयातून खाजगी रुग्णालयात उपचाराकरिता पाठवले तथा छ.संभाजी नगर जिल्ह्याचे जिल्हाप्रमुख हे जातीने तिथे लक्ष देऊन उपचारांमध्ये कोणतेही कसर बाकी राहू नये याची काळजी घेत आहेत सदरील प्रकरण हे गंभीर स्वरूपाचे असून पूर्णपणे अमानवीय आहे. व्हिडिओमध्ये मारहाण करत असलेले आरोपी तथा त्यांना प्रोत्साहन देणारे या सर्वावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करून ज्याप्रमाणे स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांच्या मारेकऱ्यांना पकडण्यासाठी व त्यांच्या आकाचा शोध घेण्यासाठी विविध पदके स्थापन करून आरोपींना अटक करण्यात आली व मकोका अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचप्रमाणे कैलास बोराडे यांना न्याय मिळावा यासाठी शिवसेना ओबीसी व्हीजेएनटी सेना चे महाराष्ट्र प्रदेशअध्यक्ष बाळासाहेब किसवे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर शिवसेना आंदोलन करणार आहे जोपर्यंत बोराडे यांना न्याय



मिळत नाही तोपर्यंत शिवसेना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून मी मनोज जरांगे पाटील यांना विनंती करतो की आपण या प्रकरणात लक्ष घालून मोठ्या भावाची भूमिका निभवाल तथा बोराडे यांना न्याय मिळण्यासाठी आमच्या खांद्याला खांदा लावून उभे राहाल ज्यातून ओबीसी व मराठा हा वाद नसून गुन्हेगाराला जात नसते हा संदेश सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचेल त्याचप्रमाणे मी प्रशासनालाही विनंती करतो की सदरील घटनेची चौकशी हे उच्चस्तरीय समितीद्वारे करून या औरंगजेबाच्या अवलादीचे आका व आकांचे आका कोण आहेत यांचा शोध घ्यावा व त्यांच्या मुस्क्या आवळून त्यांच्यावरही मको का अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी शिवसेना ओबीसी/ व्हीजेएनटी सेना राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांनी केली आहे याप्रसंगी लोहार समाजाचे मनोज चव्हाण, बैरागी समाजाचे केशवदास वैष्णव महाराज ,टकारी समाजाचे दगडू दादा गायकवाड ,भावसार समाजाचे द्वारकादास फटाले,माळी समाजाचे दुधाळ साहेब व मोठ्या प्रमाणावर ओबीसी प्रवर्गातील मान्यवर शिवसेना मध्यवर्ती कार्यालय बीड येथील पत्रकार परिषदेस उपस्थित होते.

## संपादकीय..

# डायरी लिहायचीय!



मेल आले... पत्र लिहिणं बंद झालं. मोबाइल आले... भेटीगाठी बंद झाल्या. कम्प्युटर आले... लिहिणंच बंद झालं. तंत्रज्ञानानं अशी एक एक करत वर्षानुवर्षे आपल्याशी एकजीव झालेल्या सवयी, साधनं मोडीत काढली. त्यातलीच एक म्हणजे डायरी लिहिणं. डायरी लिहिणं म्हणजे एक वेगळाच अनुभव आहे. ज्याने लिहिली त्यालाच तो माहीत. जावे त्यांच्या वंशा... असा तो अनुभव आहे. डायरी लिहिताना तुम्ही तुमचा दिवस..., तुमच्या भावना आणि तुम्ही अनुभवत असलेल्या गोष्टींबद्दल सर्व काही लिहीत असता. हे लिखाण आनंदी बनवतं. खासगी गोष्टी तुम्ही डायरीबद्ध करीत असता.आजच्या पेपरलेस आणि पेनलेस जगात या डायरीचं स्थान उरणार तरी कुठून? अनेकांना ती अजूनही लिहाविशी वाटत असेल पण जमणार कसं, हा त्यांच्यापुढे प्रश्न असतो. मात्र, ज्या तंत्रज्ञानानं हे सगळं तुमच्याकडून हिरावून घेतलं आहे, त्यानंच ते अधिक आकर्षक पद्धतीनं तुमच्यापुढं मांडलं आहे. आता डायरी लिहिणं अगदी सोपं झालं आहे. आणि नुसतीच नीरस डायरी होणार नाही तर तिला फोटो, व्हॉइस रेकॉर्ड, तुमचं लोकेशन आदींची जोडही देता येणार आहे.डायरी लिहायची असल्यास उचला तुमचा फोन आणि पटकन एक प निवडा. तुम्ही आयफोन वापरत असाल तर 'जर्नल' नावाचे एक प आहे. आणि तुमच्याकडे अँड्रॉइड फोन असेल, तर तुम्ही 'गुगल कीप' नावाचे प डाऊनलोड करू शकता. एव्हाना तुम्ही प डाऊनलोड केलं असेलच. त्यामुळे आता थांबण्याची गरज नाही. थेट प उघडा आणि नवीन एंट्री सुरू करून डायरी लिहायला सुरुवात करा. इथं लिहिण्यासाठी बरेच पर्याय आहेत. टायपिंग करून लिहायला आवडत असेल, तर टाइप करू शकता किंवा टाइप करणं कठीण वाटत असेल... कंटाळवाणं वाटत असेल, तर तुम्ही बोलू शकता. प तुम्ही बोललेले शब्द अक्षरबद्ध करेल. इथं तुम्ही तुमच्या भावना शब्दबद्ध करताना त्याला दृकश्राव्य जोडही देऊ शकता. म्हणजे, तुम्ही एखाद्या ठिकाणी फिरायला गेला आहात... तिथं छान छान फोटो, व्हिडीओ काढले आहेत... तिथल्या पशुपक्ष्यांचे... काही असेच मनाला भावलेले आवाज टिपले आहेत... कोणकोणत्या ठिकाणी फिरलो त्याची लोकेशन्स... हे सगळं तुम्ही जसंच्या तसं इथं जोडू शकता. भविष्यात कधी ही डायरी वाचनात आली, तर जसाच्या तसा तो सर्व चित्रपट तुमच्यासमोर उभा राहू शकेल. आहे की नाही मज्जा!

माझ्यासारखी काही आळशी, विसरभोळी माणसंही असतात. त्यांना डायरी लिहावीशी तर वाटते, पण कंटाळा तरी आलेला असतो नाही, तर लिहायचंच विसरून जायला होतं. त्यावरही या डिजिटल डायरीमध्ये उपाय आहे. 'जर्नल' प तुम्हाला नियमित लिहिण्याची आठवण करून देऊ शकते. हे प वापरणं एकदम सोपं आहे. जर्नल प पहिल्यांदाच उघडल्यानंतर सुरुवातीला काही सेटिंग्ज कराव्या लागतील. त्यानंतर लिखाणाला सुरुवात करण्यासाठी '+' चिन्हावर टॅप करा. ते केल्यानंतर एक विंडो सुरू होईल. तिथं तुम्हाला तुमच्या लेखनाला शीर्षक देता येईल. चांगलं शीर्षक सुचत नसेल तर सुरुवातीला काहीबाही तात्पुरतं द्या. लिखाण पूर्ण झालं आणि नंतर एखादं छानसं शीर्षक सुचलं, तर आधीचं बदलून नवीन देऊ शकता. शीर्षक दिल्यानंतर तुमच्या लेखनकामाठीला सुरुवात करू शकता. टाइप करताना आपलं लेखन सुंदर दिसावं, यासाठी विविध पर्याय दिलेले आहेत. तिथं तुम्ही चित्र जोडू शकता. हवा असलेला भाग ठळक करू शकता. आनंदी... उदासवाण्या... भावना असतील तर तसे इमोजी टाकू शकता. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, तुमची डायरी दुसऱ्या कोणीही वाचू नये पाहू नये यासाठी 'जर्नल'ला पासवर्ड लावू शकता किंवा ते अनलॉक करण्यासाठी फेस आयडी वापरू शकता. आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, तुम्ही तुमच्या मातृभाषेत लिहू शकता.'गुगल कीप'ने काय दिले आहे तेही पाहून घेऊ. प्ले स्टोअरमधून गुगल कीप डाउनलोड करा आणि ते सुरू करा. इथेही डायरीचं पान उघडण्यासाठी '+' हे चिन्ह दिलेलं आहे. त्यावर टॅप करा. तुमच्यासमोर डायरीचं पान उघडेल. आता तुम्ही लिहायला म्हजेच टाइप करायला सुरुवात करू शकता. टायपिंगचा कंटाळा असेल, तर बोलण्याची सोय आहेच. 'जर्नल'प्रमाणेच गुगल कीपमध्येही छायाचित्रं, व्हॉइस रेकॉर्डिंग जोडू शकता. याव्यतिरिक्त तुम्हाला अधिक वैशिष्ट्ये हवी असतील, तर डे वन, डायरियम, जर्नी, एव्हरनोट, मोमेंटससारखी इतर ॲपही आहेत. 'डे वन'मध्ये हवामान ट्रॅकिंग आणि टेम्पलेट्ससारखी अतिरिक्त वैशिष्ट्यं आहेत. डायरियम (विंडोज आणि अँड्रॉइड) हे गुगल कॅलेंडरशी लिंक करता येतं आणि तुम्हाला दररोज लिहिण्याची सुविधा देतं. 'जर्नी'मध्ये तुम्हाला तुमचे विचार, भावना आणि अनुभव रेकॉर्ड करता येतात. एव्हरनोट हे एक नोट-टेकिंग प आहे.या पद्वारे अनेक डिव्हाइसवरील माहिती नोंदवून घेता येते, तिचं व्यवस्थापन आणि संग्रह करता येतो. इथंही तुम्हाला टायपिंग, ऑडिओ रेकॉर्डिंग, फोटो आणि वेब क्लिपिंगसह विविध सुविधा उपलब्ध आहेत. त्याचवेळी एव्हरनोट टॅगिंग, सर्चिंग आणि ऑर्गनायझेशन टूल्सही देते. यामुळं विशिष्ट नोट्स शोधणं सोपं होतं. याव्यतिरिक्त, एव्हरनोटमध्ये एक वेब ब्राउझर एक्सटेंशन आहे. यामुळे तुम्हाला तुमच्या खात्यात थेट लेख आणि वेब पेज सेव्ह करता येतात. मोमेंटस म्हणजे आपल्या आयुष्यातील अत्यंत हळवे क्षण. जे आपण हृदयाच्या कप्प्यात निगुतीनं सांभाळून ठेवलेले असतात. या ॲपच्या पाठीमागं हीच भावना आहे. इथं तुमच्या आयुष्यातील संस्मरणीय किंवा उल्लेखनीय प्रसंगांचं जतन तुम्ही करू शकता.नियमित डायरी लिहिण्याचे वैयक्तिक विकास, मानसिक समाधान आणि कार्यक्षमता वाढीसह अनेक फायदे आहेत. आपली मानसिक स्पष्टता आणि व्यवस्थापन कौशल्य सुधारते. म्हणजे तुम्हाला तुमचे विचार आणि कल्पना व्यवस्थित मांडण्यास मदत होते. दैनंदिन घटनांवर चिंतन करण्याचा मार्ग मिळतो. आपल्या त्रुटी तपासून पाहता येतात. डायरी लिहिणं हे स्वअभिव्यक्तीचं एक रूप आहे. त्यामुळं तुमचे ताण आणि चिंता कमी होते. भूतकाळातील निर्णयांचे पुनरावलोकन करून ते निर्णय तपासून घेता येतात आणि भविष्यातील निर्णय घेण्याची क्षमता वाढते. सर्वात म्हणजे, स्मरणशक्ती आणि सर्जनशीलता वाढते. समर्थांनीही सांगून ठेवले आहे, दिसामाजी काहीतरी ते लिहित जावे... या न्यायानं नियमित लिहिल्यानं अनुभवांची साठवण आणि धारणा वाढते. आपल्याला अंतर्मुख होता येतं. लेखन आणि संवाद कौशल्य सुधारते. विचार अधिक स्पष्ट आणि संक्षिप्तपणे व्यक्त करण्यास मदत करते. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, भविष्यात तुम्ही कोणीतरी महान व्यक्ती झालात, तर ही डायरी तुमचा जीवनातला संघर्ष जगासमोर ठेवते. ती इतरांचा प्रेरणास्रोत बनते.

# झळा ज्या लागल्या जीवा!



परवाच, म्हणजे २८ फेब्रुवारीला, फाल्गुन हा मराठी महिना लागला. येत्या १४ मार्चला होळी पौर्णिमा आहे. याच पौर्णिमेला हुताशनी पौर्णिमा असंही म्हणतात. (हुताशन म्हणजे अग्नी. हुताशनी म्हणजे होळी... मराठी शब्दरत्नाकर, वै. वा. गो. आपटे) अग्नीची पूजा करायची आणि आपल्यातलं हिणकस असं सारं अग्नीला अर्पण करायचं, असा एक संकेत. होळीनंतर हवा तापायला लागते, असं आता ज्यांची वयं सत्तरीच्या उंबरठ्यावर आहेत, असे लोक सांगतात. त्या लोकांच्या आठवणीनुसार महाशिवरात्रीच्या अगोदर काही दिवसच आंब्याला मोहोर फुटायला लागायचा. सारा आसमंत त्याच्या सुगंधानं दरवळून जायचा. महाशिवरात्रीच्या दिवशी शंकराला आंब्याच्या मोहोराची एक लहानशी डिकशी वाहण्याचीही पद्धत कोकणात अनेक ठिकाणी होती. वसंत ऋतू उंबरठ्यावर आला आहे आणि कोकिळच्या आलापांनी मन प्रमुदित करण्याचे दिवसही येत आहेत, याच्या साऱ्या खुणा तेव्हा दिसायला लागायच्या. होलिकोत्सवानंतर वसंतोत्सव सुरू होणार आणि मग वैशाखवणव्याचाही अनुभव येणार, हे ठरलेलं होतं. याचं कारण ठरल्याप्रमाणं ऋतू बदलत होते आणि ऋतूंनुसार हवा पालटत होती, तेव्हाच्या या आठवणी आहेत.मात्र आता त्या साऱ्या गोष्टी स्मृतींच्या कोशातच अडकून पडू लागल्या आहेत. याचं कारण गेल्या काही वर्षांमध्ये हवा झपाट्यानं पालटत चालली आहे. यंदा तर कहर झाला आहे. फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यातच तापत्या हवेच्या झळांचा तडाखा अनेक ठिकाणी बसला आहे. होळी पौर्णिमेला तीनसाडेतीन आठवडे असतानाच हवा तापायला लागली असल्याचा अनुभव येतो आहे. येत्या दिवसांत तापमापकाचा पारा ४० अंशापर्यंत जाईल, असा अंदाज भारतीय हवामान खात्यानं व्यक्त केला आहे. मार्च महिन्यातच पारा जर ४० अंश से.ला जाऊन भिडणार असेल, तर एप्रिल आणि मे महिन्यामध्ये काय होईल, याची कल्पनाही करवत नाहीये. असह्य अशा तापानं सारेच कावले आहेत... हिवाळ्यात पडणारा पाऊस कमी झाला इथपासून ते पूर्वेकडून येणारे वारे समुद्रवाऱ्यानी अडविले जात आहेत, इथपर्यंतची कारणं या उष्णतेच्या तडाख्याला दिली जात आहेत. एका अर्थानं ही कारणं तात्कालिक आहेत. जागतिक पातळीवर हवामानात होत असलेल्या बदलांचाच हा एक परिणाम आहे, ही वस्तुस्थिती आहे आणि ती आपण मान्य करायला हवी. मुंबई आणि पणजी इथं तापलेल्या हवेच्या ज्या झळा अनुभवास आल्या, त्यामागं माणसामुळं हवामानात घडलेले बदलच कारणीभूत आहेत, असं अमेरिकेतल्या हवामान विषयक संस्थेचा 'क्लायमेट शिफ्ट इंडेक्स' सांगत आहे. या संस्थेच्या म्हण्यानुसार सध्या जगभरातल्या अनेक ठिकाणी नेहमीपेक्षा हवा अधिकच गरम झाली असल्याचा अनुभव येत आहे.खरं तर हे दिवस काही गरमीचे नाहीत. त्यामुळंच मुंबई काय किंवा इतरत्र काय, नेहमीपेक्षा जरा लवकरच गरम हवेचा चटका बसायला लागला आहे. उन्हाचा चटका बसण्याचे दिवस नेहमीपेक्षा लवकर सुरू होण्याचा अनुभव यापुढच्या काळात वारंवार येण्याची संभाव्यता खूप मोठी आहे, असंही तज्ज्ञांचं म्हणणं आहे. येत्या काही दिवसांतच उष्णतेच्या लाटेला आपल्याला सामोरं जावं लागणार आहे. समुद्रसपाटीवर तापमापकाचा पारा ४० अंशावर किंवा त्यापलीकडं गेला आणि डोंगराळ भागात पारा ३० अंशाच्यावर किंवा त्यापलीकडं गेला तर उष्णतेची लाट आली, असं म्हणता येतं, असं जागतिक आरोग्य संघटना सांगते. येत्या काळात अशी लाट येण्याचा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. तो नजरेआड करून चालणार नाही. याचं कारण हवा वाजवीपेक्षा गरम व्हायला लागली की माणसाच्या आरोग्याचे अनेक प्रश्न उभे राहतात. आकडेवारी असं सांगते की गेल्या वर्षी, १ मार्च ते ३१ जुलै २०२४ या काळात, आपल्या देशभरात उष्माघाताचा फटका एकंदर २०७४ जणांना बसला होता.महाराष्ट्रात सर्वाधिक म्हणजे ७६९जणांना, तर त्याखालोखाल पश्चिम बंगालमध्ये ५६५जणांना उष्माघाताचा तडाखा बसला! संपूर्ण २०२४ वर्षाचा विचार केला, तर ४८ हजारांहून अधिक लोकांना उष्माघाताचा त्रास झाला असण्याचा अंदाज आहे. एकंदर १६१ जणांना उष्माघातापायी आपला जीव गमवावा लागला, असं अधिकृत आकडेवारी सांगते. हा तपशील भीती घालण्यासाठी नाही, तर उन्हाळ्यामध्ये अधिकाधिक सावधगिरी बाळगण्याची नितांत गरज आहे, हे अधोरेखित करण्यासाठी दिला आहे. उन्हाळ्यामध्ये गडद रंगाचे कपडे घालू नयेत आणि काळ्या रंगाचे तर अजिबातच वापरू नयेत, या साध्या गोष्टीकडंही लक्ष दिलं जात नाही. पांढऱ्या किंवा फिक्या रंगाचे सुती कपडे हे उन्हाळ्याच्या दिवसांत वापरले तर उन्हाळा सुसह्य होतो. देश तसा वेष, असं आपण म्हणतो. आताच्या हवामानाबदलाच्या काळात हवामान तसे कपडे आणि खाणंपिणं उपयोगाचं!संपूर्ण जगाचंच हवामान बदलत आहे आणि त्याचे परिणाम गंभीर स्वरूपाचेचे आहेत, यात आता शंका नाही. इथं एक गोष्ट स्पष्ट करायला हवी. ती अशी की कोणत्याही एका जागेमधील प्रदीर्घ काळातील (वर्षं, दशकं, शतकं, लक्षावधी वर्षं) सरासरी तापमान, पाऊस आणि उष्णता लक्षात घेऊन त्या भागातील वातावरण कसं आहे, याचा आपण विचार करतो आणि त्याला आपण त्या भागातील हवामान (क्लायमेट) असं म्हणतो. उदाहरणार्थ, महाबळेश्वरचं हवामान थंड आहे, विदर्भातलं हवामान विषम आहे... याउलट काही विशिष्ट काळापुरते जे बदल होतात, त्याला आपण हवा किंवा वातावरण (वेदर) म्हणतो. म्हणजे एखाद्या दिवशी एकदम जास्त थंडी किंवा उकाडा जाणवला तर आज हवा थंड आहे किंवा वातावरणात गारठा आहे, किंवा हवेत गरमी जास्त आहे, असं आपण म्हणतो. संपूर्ण जगाचंच हवामान बदलत आहे, असं आपण म्हणतो, तेव्हा लक्षावधी वर्षं बरंचसं स्थिर असलेलं किंवा फार मोठे बदल न झालेलं हवामान आता बदलत आहे, हे आपण लक्षात घ्यायला हवं. त्याचबरोबर हेसुद्धा ध्यानात घ्यायला हवं की वर्षानुवर्षं स्थिर राहिलेल्या हवामानाला अनुसरूनच इथली सजीवसृष्टी उभी राहिलेली आहे. या हवामानात बदल झाले तर त्याचे विपरीत परिणाम या सजीवसृष्टीवर निश्चितपणं होणारचं, हे पक्कं लक्षात घ्यायला हवं.खरं तर गेल्या शतकाच्या उत्तरार्धात, म्हणजे १९८०च्या दशकातच कार्बन डायऑक्साइड आणि अन्य उष्णताशोषक वायूंचं वातावरणातील वाढतं प्रमाण आणि त्याचे धोके प्रकर्षानं लक्षात यायला लागले होते. त्यावेळी कम्प्युटरच्या मदतीनं काही प्रतिमानं (मॉडेल्स) तयार करण्यात आली होती. भरपूर माहिती, काही गृहीतके आणि अनके अनिश्चित घटक विचारात घेऊन तयार केलेली ही प्रतिमानं असं सांगत होती की कार्बन डायऑक्साइड वायूचं वातावरणातील प्रमाण दुप्पट झालं तर एकविसाव्या शतकाच्या अखेरीस पृथ्वीवरील तापमानामध्ये दोन ते पाच अंश से.ने वाढ होईल.गेल्या २० वर्षांमध्ये ज्या गतीनं हवामानात बदल होत आहेत, ते बघता आपण त्याच दिशेनं वाटचाल करत आहोत की काय, असं वाटायला लागतं. हवामानातील बदलांचा एक परिणाम म्हणजे हिमनद्या वितळणं. यासंदर्भात अलीकडंच इंग्लंडमधल्या एका विद्यापीठानं केलेल्या अभ्यासात असं दिसून आलं आहे की हिमनद्या वितळू लागल्यामुळं जगभरच्या एकंदर सागराच्या सरासरी पातळीत वाढ होत आहे. तर बंगळुरूमधील 'सेंटर फॉर स्टडी ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी अँड पॉलिसी' या संस्थेनं केलेल्या पाहणीमध्ये असं दिसून आलं आहे की १९८७ ते २०२१ या काळात मुंबईच्या समुद्राच्या सरासरी पातळीत साडेचार सेंमी वाढ झाली आहे. याबाबतचा वृत्तांत प्रसिद्ध झाल्यानंतर चार दिवसांतच उष्णतेच्या तडाख्याच्या बातम्या यायला लागल्या... हवामानातील बदलाचं प्रखर वास्तव ठळकपणं अधोरेखित करत्या झाल्या.

एक गोष्ट नक्की आहे की जागतिक तापमानाच्या नोंदी ठेवण्यास सुरुवात झाली, ती सन १८५०मध्ये! त्या नोंदी असं सांगतात की १८५०च्या नंतर पृथ्वीचं तापमान दर १० वर्षांमध्ये सरासरी ०.०६ अंश सेल्शियसनं वाढलं आहे. तापमानाच्या वाढीचा हा वेग १९८०च्या दशकामध्ये, म्हणजे नेमकेपणानं सांगायचं तर, १९८२ सालानंतर, सरासरी ०.२० अंश सें.ने वाढला आहे. सन २०२३ हे वर्ष आतापर्यंतच्या इतिहासामध्ये, म्हणजे सन १८५० सालानंतर ते आतापर्यंतच्या काळात, सर्वाधिक तप्त वर्ष म्हणून नोंदविलं गेलं आहे. विसाव्या शतकातील सरासरी तापमानापेक्षा त्या वर्षी तापमान सरासरी १.१८ अंश सें.ने अधिक होतं. सगळ्यात महत्त्वाची आणि भीतिदायक गोष्ट अशी की १८५० नंतरची सर्वाधिक तप्त वर्षं ही सन २०१४ ते २०२३ या दशकातच झाली आहेत, असं आपल्याला अधिकृत नोंदी सांगतात. सन २०२३ हे वर्ष तर गरमीचा सर्वांगीण अनुभव देऊन गेलं. दाहक चटक्याच्या नोंदी असं सांगतात की त्या वर्षी पृथ्वीचा भूभाग आणि समुद्र या दोनही ठिकाणी हवा सर्वाधिक गरम होती. दक्षिण आणि उत्तर ध्रुव या प्रदेशांनासुद्धा गरमीनं सोडलं नाही. तापी हवा अशी सगळ्यांनाच लपेटून टाकत आहे. मात्र हवा तापण्याचं प्रमाण सर्वत्र एकसारखं मात्र नाही, असंही लक्षात आलं आहे. सारखेपणा आहे, तो सरासरीपेक्षा हवा तापत जात असल्याचा. वातावरणातल्या उष्णताशोषक वायूंचं प्रमाण वेगानं वाढत आहे आणि त्याचाच हा प्रमाण आहे. या उष्णताशोषक वायूंमध्ये कार्बन डायऑक्साइड हा प्रमुख घटक आहे.मिथेन, नायट्रस ऑक्साइड, क्लोरोफ्लुरोकार्बन हे अन्य उष्णताशोषक वायू आहेत. आज आपल्या पृथ्वीच्या वातावरणात याच वायूचं प्रमाण ४२७ पीपीएम (हवेच्या १० लाख भागात कार्बन डायऑक्साईडचे ४२७ भाग!) आहे. औद्योगिकक्रांतीपूर्व काळात हेच प्रमाण २७४ पीपीएम होतं. सन १९५८मध्ये हेच प्रमाण ३१७ पीपीएम होतं. सन २००२मध्ये ते ३६५ पीपीएमवर गेलं होतं. याचा अर्थ गेल्या २३ वर्षांमध्ये कार्बन डायऑक्साइडच्या प्रमाणात ६२ पीपीएमनं वाढ झाली! अभ्यासकांच्या म्हणण्यानुसार गेल्या २०० वर्षांपेक्षा कमी काळात पृथ्वीच्या वातावरणातील कार्बन डायऑक्साइडच प्रमाण ५० टक्क्यांनी वाढलं आहे. हे प्रमाण असंच वाढत गेलं तर काय होईल, त्याची झलक आता दिसत आहे. इंटरगव्हर्नमेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंज या संस्थेनं उष्णताशोषक वायूंचं वातावरणातील वाढतं प्रमाण आणि माणसाच्या इतर कारवाया यामुळं पृथ्वीचं सरासरी तापमान (१८५०-१९००च्या पातळीपेक्षा) एक अंश सें.पेक्षा जास्त वाढलं आहे, असं स्पष्ट केलं आहे. याचे होणारे दुष्परिणाम हे सर्व जातीच्या, धर्माच्या आणि देशांच्या लोकांवर होणार आहेत, याची जाणीव आपण ठेवणं आणि त्यानुसार वागणं आवश्यक आहे.

# शिक्षण नाकारणारे धोरण

कमी पट असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांचे शिक्षण समूहात होत नसल्याने त्यांच्यात कमतरता राहते, म्हणून त्यांच्या बाबतीत विचार करावा, अशी मागणी पालक आणि शिक्षणतज्ज्ञांनी केली होती. त्यावर विचार करण्यासाठी एक समिती नेमण्याचा विचार सरकार करत आहे, असे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी काही दिवसांपूर्वी जाहीर केले होते. हे शिक्षणतज्ज्ञ कोण आणि ते कोणत्या संशोधनाआधारे ही मागणी करतात, हे कदाचित आपल्याला कधीच समजणार नाही, मात्र शिक्षणमंत्र्यांनी असे म्हटल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'कमी पट असलेली एकही मराठी शाळा बंद होणार नाही,' अशी घोषणा केली होती. जनतेने कोणावर विश्वास ठेवायचा?मुख्यमंत्र्यांच्या ग्वाहीनंतर निश्चिंत व्हायच्या आतच सरकारने नवे परिपत्रक काढले. या परिपत्रकामध्ये राज्यातील २०पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करून या शाळांचे इतर शाळांमध्ये समायोजन करण्यात येत असल्याचे म्हटले आहे. अशा शाळांतील विद्यार्थ्यांना वाहतूक सुविधेकरिता शासनाने वर्षभरासाठी प्रतिविद्यार्थी सहा हजार रुपये वाहतूक भत्ता उपलब्ध करून दिला आहे. त्यात ग्रामीण भागातील १५,०४४ तर शहरी भागातील ३,८७४ असे एकूण १९,९१८ विद्यार्थी आहेत. नव्या परिपत्रकात ही संख्या २०,४२० असल्याचे म्हटले आहे. तसेच राज्यात ३,३४१ ठिकाणी शिक्षणाची सोय नसल्याचे म्हटले आहे. शाळा घरापासून दूर नेल्यास ही मुले शिक्षणापासून वंचित होतील कारण ही सारी ठिकाणे दुर्गम आदिवासी भागातील आहेत. एक प्रकारे आदिवासी मुले शिक्षणापासून वंचित राहिली आहेत वा केली गेली आहेत. कारण मुला-मुलींना दूरच्या शाळेत पाठवणे त्यांची सुरक्षा आणि व्यवहाराच्या दृष्टीने पालकांना परवडणारे नाही.वर्णवर्चस्ववादी, पितृसत्ताक समाजव्यवस्थेच्या स्थिरतेसाठी व बळकटीकरणासाठी आवश्यक गोष्ट म्हणून महिला आणि सेवा देणाऱ्या वर्गाला शिक्षणबंदी करून शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे धोरण अनेक शतकांपासून अंगीकारण्यात आले. म्हणूनच समाजाचा एक फार मोठा वर्ग शिक्षणाअभावी केवळ अडाणीच राहिला नाही तर सर्व प्रकारच्या शोषणाचा बळी ठरला आणि त्याच्या नशिबी दीनता व दारिद्र्य आले.ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता स्थिरावल्यानंतर त्यांना प्रशासकीय व अन्य कामासाठी इंग्रजीचे ज्ञान असलेल्या नोकरदार वर्गाची गरज भासू लागली आणि ही गरज भागविण्यासाठी ब्रिटिश सत्तेने अल्प प्रमाणात का असेना, भारतीय लोकांना शिक्षित करण्याचे धोरण आखले. भारतातील आधुनिक शिक्षणाचा जनक म्हणून लॉर्ड मेकॉले याचे नाव घ्यावे लागेल. गव्हर्नर जनरल विल्यम बेंटिकने त्याची नियुक्ती शिक्षण समितीचा सभापती म्हणून केली व त्याने दिलेला शिक्षण विषयक अहवाल स्वीकारून इंग्रजी शिक्षण अधिनियम, १८३५ हा कायदा पारित करून भारतात आधुनिक किंवा इंग्रजी शिक्षणाचा पाया घातला. मेकॉलेच्या शिक्षणाचे इंग्रजी माध्यम व अन्य बाबींवर उलटसुलट चर्चा करता येईल. परंतु यामुळे भारतीय शिक्षण पारंपरिक चाकोरीतून बाहेर पडून निदान कागदावर तरी साऱ्या वर्ण आणि वर्गाच्या स्त्री-पुरुषांसाठी खुले झाले. पुढे भारतीय शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी लॉर्ड रिपनने १८८२मध्ये हंटर आयोग नेमला. हंटर यांनी प्राथमिक शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे, या शिफारशी बरोबर, सरकारी शाळांमध्ये धार्मिक शिक्षण न देण्याची महत्त्वाची शिफारस केली. त्याचप्रमाणे शाळांनी स्थानिक गरजांवर आणि व्यावहारिक पैलूंवर लक्ष केंद्रित ठेवावे, गरीब विद्यार्थ्यांना सरकारने शिष्यवृत्ती द्याव्यात, अशा शिफारशी केल्या. याच हंटर आयोगापुढे महात्मा फुल्यांनी आपल्या साक्षीत प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण नि:शुल्क आणि सक्तीचे करावे व शेतकऱ्यांवर आकारण्यात येणाऱ्या कराचा ५० टक्के वाटा केवळ प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा, अशा महत्त्वाच्या मागण्या केल्या.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडून आणण्यासाठी आणि शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी भारत सरकारने राधाकृष्णन आयोग (१९४८-४९), आचार्य नरेंद्र देव समिती (१९५२), मुदलियार आयोग (१९५२), अशा समित्या आणि आयोग नेमले. या सर्व समित्या आणि आयोगाच्या शिफारशीचा अभ्यास, संशोधन आणि सखोल चिंतन आपल्याला कोठारी आयोगात (१९६४-६६) सापडते. कोठारी आयोगाने अन्य अनेक महत्त्वाच्या शिफारशींसह, सरकारने जीडीपीच्या ६ टक्के खर्च शिक्षणावर करावा, विद्यार्थ्यांच्या घराजवळची शाळा त्याची शाळा असावी (कॉमन स्कूल), संपूर्ण देशात समान अभ्यासक्रमाचे तत्त्व अनुसरावे (कॉमन करिक्युलम), प्राथमिक शिक्षण मोफत असावे व उच्च शिक्षणात अनुदानाच्या तत्त्वाचा अंगीकार करण्यात यावा, अशा शिफारशी केल्या.शिक्षण हक्क कायदा, २००९ हा मुख्यत्वे कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधारित आहे. दुर्गम भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होऊ नयेत म्हणून या कायद्यात सहा वर्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांची शाळा घरापासून एक किलोमीटरच्या आत, तर ६ ते ८ वर्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांची शाळा तीन किलोमीटरच्या आत असावी, असे म्हटले आहे.कोठारी आयोगाच्या स्थापनेपूर्वीच शिक्षण सर्वांच्या घराजवळ असले पाहिजे, या तळमळीने छोट्या वाड्या-वस्त्यांवर पटसंख्या लक्षात न घेता एक व दोन शिक्षकी शाळा सुरू झाल्या होत्या. १९६८नंतर अशा शाळांची संख्या वाढवण्यात आली. नव्या शिक्षण धोरणात ही तळमळ सोडून शिक्षणाकडे ते किफायती आहे का, या दृष्टीने पाहिले जात आहे. त्याची झलक आपल्याला नव्या शिक्षण धोरणाच्या शाळा संकुल / क्लस्टरच्या रूपाने संसाधन आणि प्रभावी व्यवस्थापन या सातव्या प्रकरणात पाहावयास मिळते. ७.१ म्हणते, 'विविध उपक्रमांमुळे देशभरातील प्रत्येक वस्तीमध्ये शाळांची स्थापना होऊन जवळपास सर्वांना प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध झाली आहे, त्यामुळे अनेक छोट्या शाळांची निर्मिती झाली आहे. उपलब्ध माहितीनुसार भारतातील जवळजवळ २८ टक्के सार्वजनिक प्राथमिक शाळांमध्ये व १४.८ % उच्च प्राथमिक शाळांमध्ये ३०हून कमी विद्यार्थी आहेत. प्राथमिक शालेय व्यवस्थेमध्ये प्रत्येक इयत्तेत असणाऱ्या विद्यार्थ्यांची साधारण सरासरी १४ आहे. बऱ्याच शाळांमध्ये ही सरासरी सहाच्या खाली आहे. वर्ष २०१६-१७मध्ये एकच शिक्षक असलेल्या १०,८०१७ शाळा होत्या. यामध्ये एक ते पाच इयत्तेला शिकविणाऱ्या शाळांचे प्रमाण सर्वाधिक (८५.४३ %) होते.सरकारी शिक्षणतज्ज्ञांना ही समस्या वाटते आणि या समस्येचा उपाय त्यांनी ७.२ ते ७.१२मध्ये सांगून टाकला आहे, तो असा, 'या शाळांच्या छोट्या आकारामुळे त्या आर्थिकदृष्ट्या कमी दर्जाच्या ठरत आहेत. तसेच शिक्षकांची नियुक्ती आणि महत्त्वपूर्ण भौतिक साधनांच्या तरतुदींच्या दृष्टीने या शाळा चालवणे गुंतागुंतीचे झाले आहे.' पुढील भाषा कितीही सावध आणि गोंडस असली तरी नव्या शिक्षण धोरणाला ह्या शाळा बंद करायच्या आहेत. देशभरात सुमारे ६४ हजार शाळा बंद केल्याची माहिती आहे. महाराष्ट्रात १४ हजार शाळा बंद होणार असल्याचे म्हटले जाते, मात्र किती शाळा बंद केल्या ते महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेले नाही.बहुजनांच्या शिक्षणाचा पुरस्कार करून त्यांच्या उत्थानाचे स्वप्न पाहणाऱ्या, फुले-शाहू-आंबेडकरांची परंपरा लाभलेल्या पुरोगामी महाराष्ट्राला ही गोष्ट अशोभनीय आहेच; पण त्याचबरोबर ती शिक्षण हक्क कायद्याचा भंग करणारी आहे. म्हणूनच सरकारला कमी पटसंख्या असलेल्या शाळा चालवणे केवळ आवश्यकच नाही तर कायद्याने बाध्य आहे. शिक्षणावरचा खर्च वाचवण्यासाठी शाळा बंद करण्याचे धोरण अवलंबित असणाऱ्या सरकारने, 'जे सरकार शिक्षणावरचा खर्च कमी करते त्यांचा पोलिस आणि तुरुंगावरचा खर्च वाढतो,' हे 'द गॉल'चे वचन लक्षात ठेवायला हवे.

# आपापली जबाबदारी ओळखून सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता टिकवा-डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** समाजात एकिकडे सर्वत्र वणवा पेटून सर्व काही बेचिराख होत असताना दुसरीकडे एक माणूस म्हणून माझी काय भूमिका असली पाहिजे हे कळले तरच समाज एकत्रीत राहील अन्यथा सामाजिक, राष्ट्रीय एकात्मता भंग होईल असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.येथील देशमुख कोचिंग क्लासेसच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते अध्यक्षीय स्थानावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर गणेश हाके, पोनि राम पडळकर, गणेश देशमुख, डॉ.उद्धव शिंदे, आधार माणुसकी संस्थेचे ऍड.संतोष पवार, सरपंच शितल देशमुख, डॉ.प्रिया मुळे, प्राचार्य संजय देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना डॉ.राजेश इंगोले यांनी गुणवंत हा केवळ ज्ञानाने किंवा उच्चशिक्षीत होऊन किंवा मोठ-मोठ्या पदव्या, नोकऱ्या घेऊन होत नाही. तर या सोबत त्याच्या व्यक्तिमत्वाला संस्कार आणि मानवी मूल्यांची जोड असावी लागते. शिक्षण आणि संस्कार या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्या पाहिजेत तरच मानवी संस्कार आणि मूल्य टिकतील. या कलियुगात वाढलेले अनाथाश्रम, वृद्धाश्रम, दुभंगलेली नाती याचे प्रमाण पाहिले तर मग सध्याच्या स्थितीत शिक्षणाने प्रगती झाली आहे. की, अधोगती हे कळायला वाव नाही. समाजात वाढलेली गुन्हेगारी, दिवसाढवळ्या होणारे बलात्कार, खून, चोऱ्या, दरोडे हे निश्चितच भूषणावह नाही. एकीकडे भारत महासता होण्याच्या वल्गणा होत असताना दुसरीकडे मात्र देशात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत आहे, बेरोजगारांची संख्या वाढत आहे हा विरोधाभास आपल्याला लक्षात येत नाही का..? असा सवाल करीत आता समाजात होत असणाऱ्या





अन्याय, अत्याचार याविरूद्ध सर्वसामान्य जनतेनेच पेटून उठले पाहिजे. समाजात हा वणवा पेटला असताना माझी भूमिका हा वणवा विझवणाऱ्याची असावी का पेटवणाऱ्याची हे उत्तरच या देशाला महासत्ता बनवू शकते असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी केले. यावेळी बोलतांना गणेश हाके यांनी विद्यार्थ्यांनी सर्व महापुरूषांचे विचार आत्मसात करून त्याप्रमाणे चालले पाहिजे तसेच आपल्या मतापित्यांचा, गुरूजनांचा जेष्ठ श्रेष्ठ, महिलाभगिनींचा आदर बाळगून समाजात वावरले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य संजय देशमुख यांनी ही संस्था शिक्षणासोबत संस्कार ज्ञानदान देण्याचे काम करीत आहे. शिक्षणाचे बाजारीकरण होत असताना ही संस्था गोरगरीब वंचित, शोषित समाजाच्या मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करत आहे, त्यांना गुणवंत, प्रज्ञावंत, शिलवंत बनवत आहे आणि याच मार्गावर चालत राहील असे आश्वासन दिले. याप्रसंगी डॉ.उद्धव शिंदे, ऍड.संतोष पवार, गणेश देशमुख, सरपंच शीतल देशमुख यांनी प्रसंगोचित मार्गदर्शन केले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना डॉ.राजेश इंगोले, गणेश हाके व इतर मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशील सूर्यवंशी यांनी केले. तर उपस्थितांचे आभार संस्थेच्या संचालिका सुचिता देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेच्या सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

## कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंना दिलासा

# नाशिक कोर्टाची २ वर्षांच्या शिक्षेला स्थगिती आमदारकीवरील टांगती तलवार तूर्त दूर

**नाशिक(वृत्तसंस्था)**–नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना ठोठावण्यात आलेल्या २ वर्षांच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. यामुळे कोकाटे यांच्या आमदारकी व पर्यायाने मंत्रिपदावरील टांगती तलवार तूर्त दूर झाली आहे.

राज्याचे कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांना नाशिक स्थित न्यायालयाने १९९५ च्या एका प्रकरणात २ वर्षांची कैद व ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावली होती. यामुळे लोकप्रतिनिधित्व कायद्यातील तरतुदींनुसार ते विधानसभेच्या सदस्यत्वासाठी अपात्र ठरण्याची भीती होती. त्यामुळे त्यांनी या शिक्षेला वरच्या कोर्टात आव्हान दिले होते. त्यांच्या याचिकेवर सुनावणी करताना कोर्टाने गत आठवड्यात आपला निर्णय राखून ठेवला होता. हा निर्णय कोर्टाने आज दिला. त्यात कोर्टाने अपिलावरील सुनावणी सुरू असेपर्यंत कोकाटेंच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. यामुळे कोकाटे यांना मोठा दिलासा मिळाला आहे.यासंबंधीच्या माहितीनुसार, माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांनी १९९५-९७ दरम्यान शासनाकडून मिळणाऱ्या सदनिका घेतल्या होत्या. यासाठी त्यांनी आमचे उत्पन्न कमी असून, आम्हाला दुसरे कोणते घरही नाही अशी बतावणी केली होती. त्यानंतर त्यांना या सदनिका मिळाल्या. विशेष म्हणजे कोकाटे बंधूंनी केवळ त्यांना मिळालेल्या सदनिकाच घेतल्या नाही, तर इतर दोघांना मिळालेली घरेही गरीब म्हणून लाटली.ही बाब अप्पर



जिल्हाधिकारी विश्वनाथ भास्कर पाटील यांच्या लक्षात आली. त्यांनी यासंबंधी तक्रार दाखल केली. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनीही यासंबंधी एका याचिकेद्वारे कोकाटे यांच्यावर कागदपत्रांत फेरफार व फसवणुकीचा आरोप केला होता.या प्रकरणी नाशिकच्या सरकार वाडा पोलिस ठाण्यात भादंवि कलम ४२०, ४६५, ४७१,४७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयात हे प्रकरण १९९७ पासून सुरू होते. त्याचा आज निर्णय आला. प्रस्तुत प्रकरणात एकूण ४ आरोपी होते. त्यात माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांच्यासह इतर दोघांचा समावेश होता. पण कोर्टाने इतर दोन आरोपींना कोणत्याही स्वरुपाची शिक्षा ठोठावली नाही.पण कोकाटे बंधूंना २ वर्षांची शिक्षा व ५० हजार रुपयांच्या आर्थिक दंडाची शिक्षा ठोठावली. या प्रकरणात एकूण ६ साक्षीदारांची साक्ष तपासण्यात आली. जवळपास २९ वर्षांनी या खटल्याचा निकाल लागला आहे.

# हसन मुश्रीफ यांनी सोडले वाशिमचे पालकत्व

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्रिपद सोडण्याची घोषणा केली आहे. यासाठी त्यांनी आपल्या मतदारसंघासाठी पुरेसा वेळ देता येत नसल्याचा दाखला दिला आहे. पण मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा तथा रायगड व नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा तिढा सुटला नसल्याच्या पार्श्वभूमीवर मुश्रीफ यांनी हे पद सोडल्यामुळे राजकीय वर्तुळात वेगवेगळे तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारमध्ये नाशिक व रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेच्या नेत्यांत वाद सुरू आहे. नाशिकचे पालकमंत्रिपद भाजपला, तर रायगडचे पालकमंत्रिपद राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाले होते. पण या दोन्ही जागांवर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने दावा सांगितला आहे. यामुळे या दोन्ही ठिकाणच्या पालकमंत्रिपदाला स्थगिती दिली आहे. गत एक ते दीड महिन्यांपासून यावर कोणतेही राजकीय औषध सापडले नाही. त्यातच संतोष देशमुख हत्येप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांना आपल्या अन्न व नागरी पुरवठा मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे.या पार्श्वभूमीवर राज्याचे वैद्यकीय शिक्षण हसन मुश्रीफ यांनी वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्रिपद सोडण्याची घोषणा



केली आहे. हसन मुश्रीफ हे कोल्हापूरचे आहेत. कोल्हापूर पासूनचे वाशिमचे अंतर खूप जास्त आहे. यामुळे त्यांना आपल्या मतदारसंघासाठी पुरेसा वेळ देता येत नाही. परिणामी त्यांनी वाशिमचे पालकमंत्रिपद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या निर्णयाचा संबंध नाशिक व रायगडच्या वादाशी जोडला जात आहे. याविषयी राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत.

# 'त्या' कुटुंबाला शासन सर्वतोपरी मदत करेल –ॲड.निलेश हेलांडे पाटील

**जातेगाव (प्रतिनिधी):** मौजे पिंपळवाडी तालुका बीड येथे आत्महत्याग्रस्त दादाराव आश्रुबा बहिरवाल यांच्या कुटुंबाला भेट देताना कैलासवासी वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशनचे अध्यक्ष ॲड.निलेश हेलांडे पाटील (राज्यमंत्री दर्जा)यांनी असे प्रतिपादन केले यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड श्री.सुभाष साळवे तालुका कृषी अधिकारी बीड अशोक साळी,महिला व बालविकास चे मन्सुरी ए.एन. व मंगेश जाधव,उपस्थित होते.पिंपळवाडी येथील दादाराव अश्रुबा बहिरवाल यांच्या कुठुंबाची पूर्ण माहिती जाणून घेतली यावेळी त्यांची मुलगी वैशाली बहिरवाल हिच्या स्पर्धे परीक्षेसाठी मदत करण्याचे तसेच मुलगा वैभव बहिरवाल यास महिला व बालविकास मार्फत चार हजार रुपये महिन्याला अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात आली. तसेच कृषी विभागाकडून आगामी हंगामात



प्रात्यक्षिके व इतर मदत करण्याचे जिल्हाअधीक्षक कृषी अधिकारी श्री सुभाष साळवे यांनी अश्वासित केले.स्पर्धा परीक्षा अकॅडमी ची एक वर्षाची फीस बाबतही मदत करण्याबाबत चर्चा झाली.तसेच तहसीलमार्फत घरकुल तात्काळ मंजूर करून देण्याबाबत सूचित केले शासन आपल्या विविध योजनेच्या माध्यमातून आत्महत्याग्रस्त कुठुंबातील सदस्यांना सहयोग देण्यासाठी सतत प्रयत्नशील राहील अशी ग्वाही यावेळी हेलांडे पाटील यांनी दिली.यावेळी त्यांचे स्वीस सहाय्यक कृष्णकुमार देठे गावचे सरपंच शोभा बहिरवाल सुभाष बहिरवाल मंडळ अधिकारी महादेव जायभाये महसूल अधिकारी अरडकर मॅडम कृषी पर्यवेक्षक प्रशांत नाळपे ज्ञानदेव जांभळकर कृषी सहाय्यक बाळासाहेब आगाव कमलाकर शिंदे सह गावकरी उपस्थित होते.

# शालेय विद्यार्थ्यांनी प्रयोगशील बनले पाहिजे–सौ.विजया पाटील

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** शिक्षण संस्था अंबाजोगाई संचलित श्री मुकुंदराज पूर्व प्राथमिक प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक या विभागात आज मोठ्या उत्साहात विज्ञान दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या मा. सौ.विजया दत्तात्रय पाटील या होत्या. शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य बालासाहेब माने, प्रमुख अतिथी म्हणून उच्च माध्यमिक विद्यालयातील भौतिकशास्त्र विषयाचे सहशिक्षक गुणवंत केदार व अमर मुळे यांच्यासह बाबासाहेब सातपुते, नरसिंग इंगळे, अनंत पतंगे, अशोक साचणे, जनक गडकर, सचिन सोन्नर व श्रीमती कल्पना दवणे यांचीही उपस्थिती विचारमंचावर होती .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बडे राहुल यांनी केले व त्यांनी विज्ञान दिनाचे महत्त्व सांगून या सांस्कृतिक कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी सुवर्णमाला मुंडे यांनी विज्ञान विषयाची सोबत



करून आपले जीवन समृद्ध करावे असे प्रतिपादन केले.मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक स्व.डी. एन. पाटील साहेब यांच्या प्रतिमेस व थोर विज्ञान तज्ज्ञ चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. श्री मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री बालासाहेब माने सर यांनी आपल्या मनोगतातून अंधश्रद्धा अनिष्ट रूढी परंपरा यांना बाजूला सारून आपल्या बुद्धीच्या व तर्काच्या आधारावर चिकित्सकपणे विचार करून आपले जीवन समृद्ध करावे असे प्रतिपादन करण्यात आले.श्री शिवाजी शिक्षण संस्था अंबाजोगाई च्या सहसचिव मा. सौ. विजया दत्तात्रय पाटील यांच्या शुभहस्ते फित कापून शालेय विद्यार्थ्यांनी बनवलेल्या विविध प्रयोगांची पाहाणी केली आणि त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून शालेय विद्यार्थ्यांनी आधुनिकतेची वाट धरून नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे त्यातून विद्यार्थ्यांनी आपले भविष्य उज्वल केले पाहिजे व विद्यार्थी हा प्रयोगशील बनला पाहिजे. यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन करण्यात आले .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. एड. च्या प्रशिक्षणार्थी हारे निशिता यांनी केले तर आभार प्रदर्शन थातोड दुर्गा यांनी केले.

## अबू आझमीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

# औरंगजेबाचे गोडवे गाणाऱ्यांना निलंबित करा-एकनाथ शिंदेंची विधासभेत मागणी

**मुंबई (वृत्तसंस्था)**

अबू आझमी यांनी औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. त्याच्या काळात देशाचा जीडीपी २४ टक्के होता. भारताची सीमा अफगाणिस्तान आणि म्यानमारपर्यंत होती, असे म्हणत औरंगजेब आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्यात धर्माची नाही, तर सत्तेसाठी होती, असे विधान केले होते. त्यांच्या या विधानाचे पडसाद विधानसभेतही पाहायला मिळाले. औरंगजेबाचे गोडवे गायल्याबद्दल सपाचे आमदार अबू आझमी यांच्यावर गुन्हा दाखल करावा, औरंगजेबाचे गुणगान गाणाऱ्यांना सभागृहात बसण्याचा अधिकार नाही, असेही शिंदे म्हणाले.

अबू आझमी यांच्या औरंगजेबावरील वक्तव्यावरून सभागृहात गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले. अबू आझमींना निलंबित करावे आणि त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी सत्ताधारी नेत्यांकडून करण्यात आली होती. या मागणीनंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहाचे आजचे दिवसभराचे कामकाम स्थगित केले.काल, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या मारेकऱ्याचे म्हणजेच औरंग्याचे गोडवे, याठिकाणी अबू आझमीने गायले. खरे म्हणजे अबू आझमीचा निषेध करायला हवा. अबू आझमीचा धिक्कार करतो. अबू आझमीचा धक्कार करत असताना, अबू आझमीने यापूर्वी देखील छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अतिशय चुकीचे वक्तव्य केले होते. अबू आझमी वारंवार छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा जाणीवपूर्वक अपमान करतो, असा आरोपी उपमुख्यमंत्री एकनाथ



शिंदे यांनी सभागृहात बोलताना केला.छत्रपती संभाजी महाराजांनी देशासाठी बलिदान केले, आपल्या प्राणाचे बलिदान केले मात्र धर्म बदलला नाही. अशा संभाजी महाराजांचा आणि शिवाजी महाराजांचा अपमान करणे, म्हणजे हा अबू आझमी देशद्रोही आहे. म्हणून या देशद्रोह्याला या सभागृहात बसण्याचा अधिकार नाही, अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. आपण 'छावा' बघा, रईस... छावा सिनेमा बघा, असे आवाहनही त्यांनी केले.छत्रपती संभाजी महाराजांवर ४० दिवस अनन्वित अत्याचार केले. त्यांचे डोळे काढले, त्यांची नखे काढली, त्यांची जीभ कापली, अंगावरची कातडी सोलून त्यावर मीठ टाकले, एवढा अपमान केला, चाळीस दिवस हा अत्याचार सुरू होता. धर्म बदला म्हणून सांगितले. अशा औरंग्याचे गोडवे गाणे म्हणजे आपल्या राष्ट्र पुरुषांचा अपमान आहे. आपल्या देशभक्तीचा अपमान आहे, असा घणाघात करत एकनाथ शिंदे यांनी

देश धरम पर मिटने वाला, शेर शिवा का छावा था।
महा पराक्रमी परम प्रतापी, एकही शंबू राजा था।।

हा शेर सभागृहात म्हटला.

शंभू राजाने ९ वर्षांत ६९ लढाया जिंकल्या. अरे लाज वाटायला हवी. या औरंगजेबाने आपली मंदिरे तोडून टाकली. आया-बहिणींवर अत्याचार केला. आया-बहिणींवर बलात्कार झाले. या औरंग्याने बापाला कैद केले, मुलांना मारून टाकले. २७ लोकांना मारले. असे सांगत, अबू आझमी निलंबित झाला पाहीजे आणि त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी एकनाथ शिंदे यांनी केली.


# जागतिक महिला दिनी बीडमध्ये रंगणार महिलांच्या व मुलींच्या कबड्डी स्पर्धा-रुक्मिणी नागापुरे

**बीड । प्रतिनिधी**

कोरो एकल महिला संघटना मराठवाडा व एकल महिला संघटना २०१४ पासून या संघटनेच्या कामाला सुरूवात झाली. कोरो इंडिया मुबंई च्या विश्वस्त सुजाताताई खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड मध्ये बैठक झाली यामध्ये ३२ महिला एकत्रित आल्या व महिलांनी (विधवा, परीतक्ता, घटस्फोट झालेल्या, पतीने सोडलेले, पतीला सोडलेले, अपंग, पौढ कुमारी, ट्रान्स,) एकलचे प्रश्न समोर मांडले. त्यावेळी अनेक गोष्टी लक्षात घेऊन या कामाची सुरुवात कोरो इंडिया च्या सुजाताताई यांच्या सहकार्य मूळ झाली शासकीय योजना, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक हिंसाचार, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक या मुद्द्यावर काम सुरू झाले आणि आज ही संघटना मराठवाडा ४ जिल्ह्यात ११ तालुक्यातील ४५० गावातील वीस हजार महिलांच्या सोबत जोमाने कार्य सुरू आहे इतकेच नाही तर महाराष्ट्र मध्ये ५ विभागात ही सुरू झाले आहे सर्व महिलांना माणूस म्हणून जगता यावे त्यांना मान सन्मान मिळावा, त्याही माणूस आहेत त्यांना देखील इतरांसारखे जगता यावे व महिलांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा आणि समानतेच्या दिशेने वाटचाल सुरू झाली पाहिजे

आज महिलांच्या सक्षमीकरण बाबत बोललं जातं खर? तर खरच महिला आता सर्व स्वतः निर्णय घेतात का ? महिलांना मनासारखे जगता येते का? महिलांना सर्व गोष्टी चे स्वातंत्र्य आहे का? किती महिलांना स्वतः च्या सासर व माहेरच्या संपत्तीत समान अधिकार मिळालेत ? किती महिला स्वतः मनासारखा आयुष्याचा जोडीदार निवडतात? किती महिला राजकीय सत्तेत सहभाग होतात ? ज्या सत्तेत आहे त्या स्वतः निर्णय घेतात का? यासारखे असंख्य प्रश्न आहेतच ?

मग आमच्या महिलांनी ग्राउंडवर स्वतः कबड्डी कधी खेळताना दिसल्या आहेत का? म्हणून एकल महिला संघटना ही महिलांसाठी मागील ६ वर्षांपासून महिलांच्या खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन करत असते एकल महिला संघटना ही जात,धर्म, लिंग, वर्ण, न पाहता तमाम महिलांच्या साठी काम करते ती महिला आहे ती एक माणूस आहे, ती कुठल्या धर्माची का कोणत्याही जातीची, असे विचार संघटना करत नाही. विशेष या संघटना चे ब्रीद आहे ज्यांचे प्रश्न त्यांचेच नेतृत्व म्हणजे महिलांचे प्रश्न आहेत तर संघटना चे नेतृत्व ही सर्व महिलाच करतात. आमच्या महिलांना कबड्डी खेळायची इच्छा झाली आणि उठली गेली ग्राउंड वर असे चित्र दिसले कधी आम्हाला ? मनात कुठली इच्छा झाली आणि ती पूर्ण झाली अस अजून तरी दिसून येत नाही. मग सर्व महिलांचे राज्य



आले अस सहज कानावर पडते. काही अपवाद वगळता पुरुष सपोट करतात हे मान्य आहे. पण जेव्हा सुरुवात झाली कबड्डी साठी तेव्हा आमच्या महिलांना सराव करायला जागा उपलब्ध होत नाही, प्रशासन मदत करत नाही? कितीही प्रयत्न केले तर अडवलं जाते मग सत्तेत, पदावर महिला असली काय व पुरुष असला काय? महिलांना वेळ नाही, साडीवर खेळताना दिसतात कारण वेशभूषा बदल करू शकत नाही ? घरातून विरोध केला जातो किती बंधने आहेत? यासाठी पुरुष व्यवस्था यांनी विचार बदलाची गरज आहे? तिला तुम्ही सपोट करून पहा मग तिला डबल ताकतीने ती संसार करेल तिला पतीचे सहकार्य जर मिळाले न त्या कुटुंबात वाद होणारच नाही. आमच्या महिलांना काही लागत नाही. ती फार संघर्षशील आहे, सहनशील आहे? कसल्याही संकटाचा सामना करण्यासाठी ती तयार असते कमी पडते ती पतीचे म्हणून प्रेमाचे २ शब्द...

मग आपण २१ व्या शतकात असताना शिक्षण तर घेतले पण ते डोक्यात उतरवले नाही शिक्षण पूर्ण केले आणि हक्क तर मागतो कारण आता आम्हाला कायदे माहिती झाले आहे, अधिकार माहिती झालेत पण आम्ही महिला म्हणून अजून कुठं आहोत याकडे लक्ष दिले पाहिजे. गावपातळीवर काम करत असताना आम्ही महिलांवर इतक्या मोठ्या घरातील जबाबदारी टाकली आहे की, तिला स्वतः साठी स्वतः कडे पाहायला वेळच मिळाला नाही पाहिजे असं सर्व कामाच्या थप्प्या तिच्या पुढे रचल्यात आणि मग कुठं काही महिलांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आले असताना किती महिलांचा सहभाग असतो हे लक्षात येते. महिलांनी पण लक्षात घेऊन आता स्वतः साठी द्यावा माझ्यासाठी चांगले काय याचा विचार केला पाहिजे हे आयुष्य वाळूसारखं निसटून जात आहे वेळ कुणासाठी थांबत नाही स्वतःला वेळ द्यावा लागेल जगवून घेतले पाहिजे

एकमेकांचा तिरस्कार न करता समजून घेऊन बदल करावा आपल्याला शिवरायांच्या कार्य वाचावे लागेल, डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार ऐकावे लागतीलच आपण रमाई, जिजाऊ सावित्रीबाई यांचा इतिहास समजून घेतला पाहिजे आणि फक्त महिलांनी नाही तर पुरुष युवकांना सुद्धा अभ्यास करण्याची गरज आहे. नेमके काय करायचं आहे आम्हाला? कोणत्या दिशेने वाटचाल करायची हा विचार करून भविष्यात आमची पुढच्या पिढीसाठी आता जागे होण्याची गरज आहे. चांगली पिढी तयार करू या व माणसासारखे वागू या दुसऱ्याची मुलगी आई बहीण हिच्यात आपली बहीण आई, मुलगी जर पाहिली तर अत्याचार होणारच नाही आम्ही संतांच्या भूमीत जन्माला आलो आहोत तर आमचे विचार ही तेवढे मोठेच असावेत.

एकल महिला संघटना ही संविधानिक मूल्यांवर काम करताना कोणताही भेदभाव न करता सर्व महिलांना आवाहन करते जागतिक महिला दिनानिमित्त कोरो एकल महिला संघटना च्या वतीने आयोजित महिलांच्या खुल्या कबड्डी स्पर्धेत महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे दि ९ मार्च बीड रविवार संपर्क साधावा

रुक्मिणी नागापुरे कोरो एकल महिला संघटना ९०४९०३५४१५/७३८५५७७५२१

# विधी शिक्षण प्रवेश परीक्षेसाठी १७ मार्चपर्यंत नोंदणी करता येणार-अ‍ॅड.नागनाथ बुध्दलवाड

**नांदेड । हानुमंत चंदनकर**

बारावी नंतर तसेच पदवीधर विद्यार्थ्यांसाठी विधी शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेच्या नाव नोंदणीसाठी महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने १७मार्चपर्यंत मुदतवाढ दिल्याने या संधीचा इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभघेऊन ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन ड नागनाथ बुद्धलवाड (गागलेगावकर) यांनी केले आहे.



ड नागनाथ बुद्धलवाड (गागलेगावकर) यांनी म्हटले आहे की, विधी अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्याच्या अंतिम मुदतीत तिसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे. पर्वी २७ जानेवारी, त्यानंतर २९ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली गेली होती. आता पुन्हा एकदा मुदत वाढवत १७ मार्च पर्यंत अर्ज करता येणार आहे. यंदा एलएलबी ३ वर्षे अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा ४ मे रोजी आणि एलएलबी ५ वर्षे अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा २८ एप्रिल रोजी होणार असल्याचे अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले आहे.

जे विद्यार्थी कायद्याच्या क्षेत्रात करिअर करू इच्छितात, त्यांनी ही संधी दवडू नये. कायदा शिक्षण घेतल्याने मानवी हक्क संरक्षण, पर्यावरण कायदे, कॉर्पोरेट लॉ यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये उज्वल संधी उपलब्ध होतात. तसेच, विद्यार्थी न्यायिक सेवा, सरकारी वकील, कायदा सल्लागार यांसारख्या पदांवर काम करू शकतात. राज्य सामाईक प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्वतयारी म्हणून कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (सीइटी) देणे बंधनकारक आहे. त्यामुळे इच्छुक विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज भरून ही संधी साधावी. अधिक माहितीसाठी विद्यार्थी महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळाला द्यावी, अर्ज भरण्यासाठी काही माहिती हवी असल्यास मार्गदर्शन केले जाईल, असे ड नागनाथ बुद्धलवाड (गागलेगावकर) यांनी म्हटले आहे.

# शेतकऱ्यांना वेकोलीकडून नुकसान भरपाई मिळण्यासाठी शासनस्तरावर धोरण ठरवावे

## आमदार सुधीर मुनगंटीवार यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यात वेकोलीच्या कोळसा वाहतुकीमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांना वेकोलीकडून योग्य ती नुकसान भरपाई मिळावी, यासाठी शासनस्तरावर ठोस धोरण ठरवावे, अशी मागणी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

वणी तालुक्यातील वणी नॉर्थ आणि वणी क्षेत्र असे वेकोलीचे दोन मोठे विभाग आहेत. या विभागांमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात कोळश्याच्या धूळीचे प्रदूषण होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होते. परिणामी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानाचाही सामना त्यांना करावा लागत आहे. जिल्हा प्रशासनाने वेकोली अधिकाऱ्यांसोबत समन्वय साधून, तात्पुरत्या स्वरूपात एनडीआरएफच्या धरतीवर प्रति हेक्टरी १३५०० रुपयांची नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला. मात्र, भविष्यातही हा प्रश्न कायम राहणार असल्याने, वेकोली उत्पादनावर आधारित नुकसान भरपाईचे निश्चित धोरण आवश्यक आहे, याकडे आमदार मुनगंटीवार यांनी पत्रातून लक्ष वेधले आहे.



# मोहिमाता शाळेचे शेख गुलाब सेवानिवृत्त

**मादळमोही (प्रतिनिधी):** गेवराई तालुक्यातील मादळमोही येथील मोहिमाता विद्यालय या शाळेचे सहशिक्षक शेख गुलाब हमीद वयोमानानुसार २८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाले शाळेच्या वतीने त्यांना निरोप देण्यात आला या वेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेवराई तालुक्यातील मादळमोही येथील मोहिमाता विद्यालय या शाळेचे सहशिक्षक शेख गुलाब हमीद हे वयोमानानुसार २८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाले त्या मुळे शाळेच्या वतीने सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमांचे आयोजन मोहीमाता शाळेच्या प्रांगणात सकाळी १०:०० वाजता करण्यात आले.या कार्यक्रमाची सुरुवात झाली प्रथम शाळेच्या वतीने शेख गुलाब यांचा सपत्नीक कपड्यांचा आहेर, शाल, श्रीफळ फेटा बांधून पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रस्ताविक पठाण जाकिरखॉ यांनी केले गुलाब सर यांनी आपल्या मनोगतात त आपल्या शालेय,महाविद्यालयीन व व्यावसायिक शिक्षण कसे पुर्ण केले त्यांच्या जीवनातील चढ उतार व त्यांना लाभलेले वेगवेगळ्या व्यक्तीचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य त्या विषयी मनोगत व्यक्त केले तसेच मोहीमाता शिक्षण संस्थेच्या वतीने मोहिमाता शाळे मध्ये सेवा करण्याची संधी कशी प्राप्त झाली हा संघर्ष शब्दबद्ध केरुन सांगीतला .त्यानी आपल्या जीवनातील अनेक आठवणींना उजाळा दिला व जुन्या नव्या सहकार्याच्या आठवणी सांगितल्या.या प्रसंगी आपले जीवन अविरतपणे समाज हितासाठी देण्या संबंधी संकल्प केला.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मोहिमाता शिक्षण संस्थेचे सचिव पद्माकर सरपते हे उपस्थित होते या वेळी अख्तर सज्जाद उर्दू शाळेचे मुख्याध्यापक,मोहिमाता शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख तय्यब तर आभारप्रदर्शन भोसले महादेव यांनी मानले

## वडखेल येथील वैशालीच्या जिद्दीचा सन्मान

# पतीच्या निधनाचे दुःख पचवून शासकीय सेवेत मिळविले स्थान

**परळी । प्रतिनिधी**

शिक्षण सुरू असतानाच तिचं लग्न झालं. लग्नानंतर वर्षभराच्या दुर्दैवाने पतीचे निधन झाले. पतीच्या निधनानंतर समोर काळाकुट्ट अंधार दिसत होता. परंतू तिच्या आई-वडिलांनी तिला धीर दिला. तिनेही पुन्हा नव्या आयुष्याची आखणी केली. पुन्हा अभ्यासाला लागली आणि शासकीय सेवेत वरिष्ठ लिपिक म्हणून स्थान मिळविले. ही कहाणी आहे वडखेल येथील वैशाली पद्मिनी मधुकर देवकते या तरुणीची. तिच्या या यशाबद्दल वडखेल ग्रामस्थांनी तिच्या जिद्दीचा सन्मान करण्यासाठी जाहीर सत्कार केला. याच वेळी सोन्नर कुटुंबातील अधिकारी झालेल्या तीन भावंडांचाही सत्कार करण्यात आला.

वडखेल येथील पद्मिनी आणि मधुकर देवकते यांची वैशाली ही मुलगी. तिचे शिक्षण सुरू असतानाच तिचा विवाह नात्यातील एका युवकाशी करून देण्यात आला. परंतू लग्नानंतर काही महिन्यातच त्याचे निधन झाले. तिने न डगमगता पुन्हा अभ्यास सुरू केली. हे करीत असताना तिला आणि तिच्या आई-वडिलांनी खूप टोमणे सहन करावे लागले. सत्काराला उत्तर देताना तिने त्या वेदना मांडल्या तेव्हा तिच्या आई-वडिलांच्या आश्रूंचा बांध फुटला. वैशालीने आपले आश्रू आवरीत तुम्ही लोक काय म्हणतात याचा विचार न करता आपल्या धैय्यावर लक्ष केंद्रित करा, यश नक्कीच मिळेल, असा आशावाद व्यक्त केला.वडखेल येथील कांताबाई शामसुंदर सोन्नर यांची तीन मुले अनुक्रमे माधुरी (कर निरीक्षक, विक्रीकरविभाग महाराष्ट्र शासन ), ज्ञानेश्वरी (सहाय्यक कायदा अधिकारी, मुंबई महानगरपालिका) आणि साईप्रसाद (सिव्हिलइंजिनियर असिस्टंट) यांनी शासकीय सेवेत अधिकारी पद मिळविले आहे. त्यांचाही सत्कार वडखेल ग्रामस्थांकडून करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना साईप्रसाद सोन्नर यांनी अत्यंत ह्रदयाला चटका लावणारे मनोगत व्यक्त केले. आम्ही भावंडांनी शिकावे यासाठी आई-वडिलांनी खूप कष्ट घेतले. माझी आई तर उन्हातान्हात शेतात राबत होती. दुपारी जेवणाच्या विसाव्याला बसली की तिचा रोज फोन यायचा. अभ्यासाची चौकशी करायची. अभ्यास सुरू होता. यश हुलकावण्या देत होतं. मी एसी अभ्यासिकेत बसून अभ्यास करत होतो आणि आई उन्हातान्हात राबत होती. पुस्तक वाचताना घामाने डबडबलेला तिचा चेहरा पुस्तकात दिसायचा. मग हताश व्हायचो. सरळ अभ्यास सोडून घरी यावं असं वाटायचं. पण आई धीर द्यायची. तेव्हा मी पुन्हा नव्या जोमाने अभ्यासाला लागायचो. आज यशस्वी झालो. ज्या मुलांना शिकवण्यासाठी बाहेर पाठविले आहे, त्यांनी आई-वडीलांच्या कष्टाची जाणीव ठेवावी, यश नक्कीच मिळेल, असे साईप्रसाद यांनी सांगितले.

सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सरपंच भारतबाई व्यंकटराव देवकते या होत्या. यावेळी परळीचे नायब तहसीलदार बी. एल. रुपनर, तसेच सूर्यकांत वडखेलकर यांचा निवृत्तीबद्दल सत्कार करण्यात आला. या वेळी पत्रकार प्रकाश चव्हाण, चंद्रकांत देवकते, माऊली महाराज आगलावे, अशोक देवकते आदींची भाषणे झाली. अनिल पांचाळ यांनी सूत्रसंचालन केले तर गणेश देवकते यांनी आभार मानले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077